Nov - Dec 2022 22-23 ISSN-2277- 8721

# EIIRJ

## ELECTRONIC INTERNATIONAL INTERDISCIPLINARY RESEARCH JOURNAL

VOLUME-XI, SPECIAL ISSUE-1 SJIF IMPACT FACTOR: 8.095

**PEER REVIEWED REFEREED JOURNAL**

SHIVAJI COLLEGE • HINGOLI •



T.C.
Assistant Professor
...llege, Hingoli.
...(M.S.)

Scanned with OKEN Scanner

ISSN-2277-8721
OPEN ACCESS

SHIVAJI COLLEGE HINGOLI

# EIIRJ

# ELECTRONIC INTERNATIONAL INTERDISCIPLINARY RESEARCH JOURNAL

SJIF Impact Factor: 8.095
Peer Reviewed Referred Journal
Volume-XI, Special Issue- I Nov - Dec 2022

T.C
Lecturer
Shivaji College,Hingoli
Tq. & Dist.Hingoli (MS.)

*Chief -Editor*
*Dr.Sangeeta Pande*

*Sub Editor*
*Mr.Mandar Thakur*
*Mr. Laxmikant Satpute*
*Dr. Sunildatta Gavare*

Scanned with OKEN Scanner

*Electronic International Interdisciplinary Research Journal*
*ISSN–2277- 8721*
*SJIF Impact Factor: 8.095*
*Peer Reviewed Referred Journal*
*Volume–XI, Special Issue– I*
*Nov – Dec 2022*

SHIVAJI COLLEGE HINGOLI

**Copyright:**
*@ All rights reserved. No part of this publication may be reproduced, stored in a retrieval system or transmitted in any form or by any means, electronic, mechanical, photocopying, recording and/or otherwise, without the prior written permission of the publisher.*
***Disclaimer:***
*All views expressed in the journal are those of the individual contributors. The editor and Publisher are not responsible for the statements made or the opinions expressed by the authors.*

***Managing Editor & Publisher:***
*Pramila. D.Thokle ( 8850069281)*
*(Email Id: eiirj1111@gmail.com)*

CC BY

***Electronic International Interdisciplinary Research Journal*** **is licensed Based on a work at**
https://www.aarhat.com/journals/eiirj/?page=home

T.C
Lecturer
Shivaji College,Hingoli
Tq.& Dist.Hingoli (MS.)

***Publication:***
***Aarhat Publication & Aarhat Journals***
*Shop No 108, Gokuldham Park, Near TV Tower, Badlapur (E),421503*
*Email ID: aarhatpublication@gmail.com*

Scanned with OKEN Scanner

ISSN–2277- 8721

EIIRJ

Electronic International Interdisciplinary Research Journal

Volume–XI, Special Issue– I

Nov – Dec 2022

OPEN ACCESS

Original Research Article

SHIVAJI COLLEGE HINGOLI


| | | | |
|---|---|---|---|
| 17 | नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण आणि मूल्यशिक्षण | डॉ. धनराज हाडुळे | 100 |
| 18 | Education for Peace - A Dire Necessity | *Dr. Amita Valmiki* | 110 |
| 19 | Origin and Development of the Values and Ethics | *Prof. Pradnya Pandit* | 115 |
| 20 | Implementation of Pilgrimage Approach New Education Policy in the Vision of Sree Narayan Guru | *Ms.Beena Jaiprakash More* | 122 |
| 21 | New Education Policy 2020: Foundation Of A Nation Based On Ethics And Human Values | *Dr. Kokila Kalekar* | 127 |
| 22 | नवीन शैक्षणिक धोरण व आव्हाने | सौ. निकिता पंकज तरे | 132 |
| 23 | स्त्रीवाद: एक समाजाधिष्ठित तात्विक विवेचन | डॉ. रीना अविनाश पितळे पुराडकर | 138 |
| 24 | परिवर्तनशील समाजासाठी फुले, शाहू, आंबेडकर यांची स्त्रीवादी विचारधारा | डॉ. रोहित गायकवाड | 144 |
| 25 | स्त्री संत: भक्ती आणि स्त्रीमुक्ती | प्रा.कीर्ती नारायणराव मार्डीकर | 150 |
| 26 | हिंदू कोड बिल आणी भारतीय महिला | डॉ. भुसारे सुनंदा रामचंद्र | 154 |
| 27 | बसव दर्शनातील स्त्री विषयक विचार | डॉ. उद्धव नरहरी कांबळे | 159 |
| 28 | संत जनाबाई : स्त्री शक्तीचा अविष्कार | प्रा.सोनाली सुरेश पेकम | 164 |
| 29 | तंत्रज्ञान हे शिक्षकाला पर्याय नसून शिक्षकाच्या प्रगतीस सहाय्यक | प्रा.वर्षा नितीन जपे | 168 |
| 30 | भारतीय स्त्रियांचे सामाजिक स्थान | डॉ. बाळासाहेब संपतराव मुळीक | 172 |
| 31 | वैदिक कालखंडातील स्त्री जीवनविषयक विचार | सौ.गौरी हेमकांत गायकवाड | 178 |
| 32 | The Status of Women in the Three Eras -- With Special Reference to Jyotirao & Savitribai Phule | *Ms.Swadha Dinesh Nathalkar* | 182 |
| 33 | स्त्री भारतीय समाजात स्त्रियांचे सामाजिक स्थान : काल आज आणि उद्या | कु. समीना दस्तगीर अत्तार | 185 |
| 34 | स्वातंत्र्याचे अमृत महोत्सवी वर्ष आणि लोकशाही पुढची आव्हाने | डॉ .माधव नरहरी कांबळे | 191 |


T.C
Lecturer
Shivaji College,Hingoli
Ta.& Dist.Hingoli (MS.)



Scanned with OKEN Scanner

ISSN-2277- 8721

EIIRJ Electronic International Interdisciplinary Research Journal

Volume–XI, Special Issue– I Nov – Dec 2022

OPEN ACCESS Original Research Article

# हिंदू कोड बिल आणी भारतीय महिला

* डॉ. भुसारे सुनंदा रामचंद्र,

*तत्त्वज्ञान विभाग, शिवाजी महाविद्यालय, हिंगोली

**सारांश :**

*सामाजिक स्तरावर जडणघडण होण्यासाठी चिंतन-मनन होणे गरजेचे असते. समाजामध्ये सकारात्मक व वैचारिक बदल घडून आणावयाचे असतील तर त्या समाजातील जास्तीत जास्त व्यक्ती या सुशिक्षित असणे गरजेचे असते. म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर एका ठिकाणी म्हणतात, "ज्या समाजातील लोक जास्तीत जास्त सुशिक्षित असतील त्या समाजाचा विकास झपाट्याने घडून येतो." प्रस्तुत शोध निबंधात हिंदू कोड बिलाला संबंधी चर्चा केली जाणार आहे. मनुस्मृति प्रमाणे महिलांना अस्तित्वहीन लेखन, त्यांना कोणत्याच प्रकारचा अधिकार देणे टाळणे हा पुरुषप्रधान भारतीय समाजव्यवस्थेचा एक जन्मसिद्ध अधिकार होता. त्यामुळे 50 टक्के समाज अशिक्षित, अडाणी आहे. तो प्रामुख्याने महिला समाज होय. त्यामुळे भारतीय महिलांचे हक्क व कर्तव्य या संदर्भाने विचार केला असता भारतीय महिलांच्या हक्क पेक्षा त्यांना त्यांच्या कर्तव्याची जास्त जाणीव करून दिली जाते. अस्तित्व हीन जीवन त्यांना कायम जगावे लागते. या संदर्भाने प्रस्तुत शोधनिबंधात सविस्तर चर्चा करण्यात येणार आहे.*

**Copyright © 2022 The Author(s):** This is an open-access article distributed under the terms of the Creative Commons Attribution 4.0 International License (CC BY-NC 4.0) which permits unrestricted use, distribution, and reproduction in any medium for non-commercial use provided the original author and source are credited.

**संज्ञा :**

संशोधन करत असताना एखादी अस्पष्ट, अनाकलनीय संज्ञा असेल तर त्या संज्ञेची व्याख्या समरपक शब्दात करून त्याचे विश्लेषण करणे होय. 'हिंदू कोड बिल' या संज्ञे संबंधी मुख्यत्वे सविस्तर विवेचन करण्यात येणार आहे. संज्ञा म्हणजे विशिष्ट घटकाला दिले गेलेले शीर्षक किंवा नामाभिधान होय. ज्याद्वारे वस्तू, व्यक्ती, घटनेचा अर्थ प्रदर्शित होतो.

**प्रस्तावना :**

प्रस्तुत विषयाच्या अनुषंगाने विचार करत असताना अत्यंत मूलगामी विचार करणे गरजेचे ठरते. हिंदू कोड बिल म्हणजे भारतीय पुरुषप्रधान संस्कृतीमध्ये स्त्रियांच्या अस्तित्वाचा जाहीरनामा होय. असेच म्हणावे लागेल. भारतीय पुरुषप्रधान मानसिकतेचा अभ्यास केला असता असे लक्षात येते की पुरुष कितीही शिकला तरी त्याची स्त्रियांच्या संदर्भातील गुलामगिरीची मानसिकता बदलणे कठीण. याचे बोलके उदाहरण म्हणजे स्वतंत्र भारताचे पहिले राष्ट्रपती डॉ. राजेंद्र प्रसाद हे होते. त्यांनी हिंदू कोड बिला संबंधा एके ठिकाणी आपले मत व्यक्त केले आहे. ते म्हणतात, "प्रिय जवाहरलालजी, ह्या बिलाचे खूप सारे फायदे असले तरी माझी अशी धारणा आहे की, बिलाच्या दुरगामी परिणामांबद्दल लोकात बरेच मतभेद आहेत. त्यामुळे कायदेमंडळ म्हणून कामकाज पाहणाऱ्या घटना समितीने



SHIVAJI COLLEGE HINGOLI
Lecturer Shivaji College, Hingoli Dist.Hingoli (MS)

हे बिल पास करू नये. कोणत्याही परिस्थितीत घटना समितीने हे बिल उचलून धरू नये व पास करण्याची घाई करू नये. बिलाच्या दुसऱ्या वाचनाची ही घाई स्पष्टपणे दिसून आली. ह्या संदर्भात मी माझी प्रतिक्रिया व्यक्त केली आहेच. मी विनंती करीन की, या साऱ्या बाबी लक्षात घेऊन आपण विचार करावा."1 ते आणखी एके ठिकाणी म्हणतात, "मी जुन्या मताचा ( *Conservative*)आहे. पुर्वापार चालत आलेल्या गोष्टींवर माझी श्रद्धा आहे. माझी मते तुम्हाला प्रतिगामी वाटतील."2 भारताचे पहिले राष्ट्रपती डॉ. राजेंद्र प्रसाद यांचे हिंदू कोड बिल यासंबंधीचे हे विचार आहेत. म्हणजे भारतात प्राचीन काळापासून स्त्री दास्यच स्वीकारले गेले होते. त्याला डॉक्टर राजेंद्र प्रसाद अपवाद नव्हते. प्रतिगामी विचार परंपरेचा ते एक खांदा पुरस्कर्ते होते. म्हणून त्यांना हिंदू कोड बिल मान्य नव्हते. हिंदू कोड बिल म्हणजे तरी काय? तर दत्तक विधान, हिंदू स्त्रियांना वडिलांच्या संपत्तीत अधिकार, आंतरजातीय विवाहाचा अधिकार, हिंदू पुरुषांना एकापेक्षा जास्त विवाह करण्याचा अधिकार नाकारणे. या संदर्भाने म्हणजेच एकूणच स्त्री अस्तित्व संबंधाने प्रस्तुत शोध निबंधात चिकित्सा करण्यात येणार आहे.

**उद्देश :**

१) आजच्या स्त्रियांच्या स्थितीचा मागोवा घेणे.

२) खरोखरच स्त्रियांना मालकी हक्क, वारसाहक्क, विवाहाचे स्वातंत्र्य, निर्णय स्वातंत्र्य, दत्तक अधिकार दिले गेले आहेत का? याची शहानिशा करणे.

३) रुढी-परंपरांचा स्त्री मनावरील पगडा किती प्रमाणात कमी होऊ शकला याची चिकित्सा करणे.

४) स्त्री वर्गातील स्वत्वाचे भान तपासून पाहणे.

**विषय विश्लेषण :**

प्रस्तुत शोधनिबंधाच्या विषयाचा बारकाईने विचार केला असता काही प्रश्नांची चिकित्सा करणे आज महत्वाचे ठरते. निसर्गतः एकूण मानव जातीचा विचार केला असता 'मानवता' या दृष्टिकोनातून संपूर्ण जगातील मानव जात काही शारीरिक लिंगभेद म्हणजेच स्त्री-पुरुष सोडले तर सारखी, समान आहे. म्हणून समानता प्रत्येकाचा निसर्गदत्त अधिकार आहे. पण मानव जातीचा इतिहास अभ्यासला असता मानवा मानवातील द्वेषामुळे, तसेच त्याच्या अति स्वार्थी स्वभावामुळे त्याने माणसामाणसात विभाजन केले. माणसाला माणूस म्हणून न वागवता तो स्वतःचा गुलाम म्हणून वागत आला आहे. माणसाच्या ठिकाणी अहंभाव आहे. त्यामुळे तो स्वतःला श्रेष्ठ समजतो. स्वतःच्या श्रेष्ठत्वाच्या भावनेमुळे, बळाचा वापर करून त्याने सृष्टीतील इतर प्राण्यांवर तसेच स्त्रियांवर ही अनेक अनन्वित त्याच्या केले. तिला अबला समजून तिच्यावर बंधने घातली. तिचे स्वातंत्र्य हिरावून घेतले. अतिप्राचीन काळे स्त्री आणि पुरुष समान, नैसर्गिक पद्धतीने आपले जीवन जगत होते. जेव्हा की त्यांच्या ठिकाणी श्रेष्ठ-कनिष्ठ त्याची भावना नव्हती. त्यामुळे निसर्गतः जो बळाचा वापर करून सर्वजण उदरनिर्वाह करत. तो सर्वांसाठी समान होता. एवढेच नाही तर नवनिर्मितीची क्षमता फक्त स्त्रियांमध्ये असते. ती काहीतरी वेगळी आहे. तिच्या ठिकाणे दैवी शक्ती आहे. हे गृहीत धरून तो इतरांसारखाच व्यवहार स्त्रीशी ही करत असे. मूलतः भटक्या

Shivaji College Hingoli
T.C Lecturer
Shivaji College, Hingoli Ta.& Dist.Hingoli (MS.)

ISSN–2277- 8721
EIIRJ Electronic International Interdisciplinary Research Journal
Volume–XI, Special Issue– I Nov – Dec 2022
OPEN ACCESS Original Research Article

स्वभावाचा असलेला पुरुष. स्त्रीला मात्र तिच्या सोबत असलेले लहान, म्हातारे सर्वांना एकत्र घेऊन जगावे लागत असे. कालांतराने जेव्हा पुरुषाच्या हे लक्षात आले की, स्त्रीच्या ठिकाणी जी नवनिर्मितीची क्षमता आहे ती माझ्यामुळे आहे. जेव्हा माणसाने जमीन नांगरण्यासाठी नांगराचा शोध लागला तेव्हा त्याला याची जाणीव झाली. आणि सृष्टीतील सर्व प्राणी आणि विशेषतः स्त्रियांवर वर्चस्व गाजू लागला. हळूहळू त्याने स्त्रीवर मालकीहक्क दाखवायला सुरुवात केली. मनुस्मृतीच्या काळात तर याचा कहरच झाला. समाज सुव्यवस्थित चालविण्यासाठी नव्हे तर वर्ण वर्चस्वासाठी मनूने समाजाचे चातुर्वर्ण्यात विभाजन केले. अनेक अन्यायकारक कायदे त्याने मनुस्मृतीत लिहून ठेवले. वर्णवर्चस्वाच्या माध्यमातून वरिष्ठ वर्ण म्हणजे ब्राह्मण या वर्णाने इतर सर्व म्हणजेच तीनही वर्णांना कनिष्ठ, शूद्र लेखले. आणि गंमत म्हणजे ब्राह्मणांनी त्यांच्याच स्त्रियांना मात्र आती शूद्रा च्याही खालचा दर्जा दिला. आणि तेव्हापासून स्त्रियांचे समाजातील स्थान कमी होत गेले. तिला अस्तित्व हीन ठरविण्याचे काम सुरुवातीला मनूनेच मनुस्मृतीच्या माध्यमातून केले. शूद्राची स्त्री तर शूद्रच पण ब्राह्मण स्त्री ही शूद्र असे चित्र समाजात निर्माण झाले. मनूनेच स्त्रीला मोक्षाच्या मार्गातील धोंड, नरकाचे द्वार संबोधले. त्यामुळे तिला कुठल्याच धार्मिक कार्याचा अधिकार नाही तिला संपत्ती संपादनाचा बाळगण्याचा अधिकार नाही. एवढेच नाही तर स्त्री जन्म सुद्धा अनुल्लेखाने मारला. मुलगी झाली तर काहीच झाले नाही असे सांगण्याची प्रथा आजही राजस्थान मध्ये आपल्याला पाहायला मिळते. यालाच अनुल्लेखाने मारणे असे म्हटले जाते. ब्राह्मण स्त्री ला तिच्या पतिनिधनानंतर जे भोगावे लागते ते अत्याचार आठवले तरी अंगावर काटा आणणारे होते. मनुने अस्तित्वहीन जगण्या शिवाय दुसरे काहीही हिंदू स्त्रीला दिलेले दिसत नाही. म्हणून स्त्रीने स्वतःच मनुस्मृतीचे दहन केले पाहिजे. पण स्त्रियांच्या अज्ञानामुळे त्या स्वतःच मनुवादी विचार आला खत पाणी घालतात. धर्म पालनाच्या नावाखाली तेत्या अंधश्रद्धेत बुडलेल्या आहेत. याचा विचार करून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी यासंदर्भात अतिशय महान कार्य केले. ते म्हणजे त्यांनी मनुस्मृतीचे दहन करून स्त्रियांना जागं करून त्यांच्या अधिकाराची जाणीव करून देण्यासाठी त्यांनी दिवसरात्र परिश्रम करून हिंदू कोड बिल तयार केले. खरेतर माणूस म्हणून जीवन जगण्याचा अधिकार कोणी कोणाला देण्याची किंवा मागण्याची आवश्यकता नाही. कारण माणूस म्हणून जन्माला आल्यानंतर त्याने कसे जगावे मग ती स्त्री असो वा पुरुष हे इतर कुणी सांगण्याची गरज नाही, नसावी. प्रत्येकाला आपण आपले आयुष्य कसे जगले पाहिजे हे ठरविण्याचा पूर्णपणे अधिकार असला पाहिजे हे नैसर्गिक आहे. पण भारतीय समाजात मात्र हे होताना दिसून येत नाही. म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्त्री, शूद्रांना त्यांच्या अधिकाराची जाणीव करून देण्याच्या उद्देशाने अपार कष्ट उपसून तसेच सर्वांचा विरोध पत्करून हिंदू कोड बिलाची निर्मिती केली. ज्यात स्त्रियांना वारसा हक्क, दत्तक विधान, संपत्तीचा अधिकार, निर्णय स्वातंत्र्य इत्यादी गोष्टींचा अंतर्भाव करण्यात आला होता. परंतु ज्यांच्यासाठी हे हिंदू कोड बिल तयार करण्यात आले त्या स्त्रियांचाच त्याला विरोध होत आहे हे पाहता डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना दुःख झाले. हिंदू कोड बिल हे वस्तुतः स्त्रियांनाच आर्थिक, सामाजिक व धार्मिक स्वायत्तता मिळवून देण्याचे एक फार मोठे साधन होते. परंतु स्त्रियांनी हिंदू कोड बिलाला बद्दल आत्मीयता दाखवली नाही असे ते म्हणतात. "स्त्रियांच्या सर्वस्वी हिताचे हे बिल मंजूर करण्यासाठी स्त्रियांनी काहीच हलचाल केले नाही हे खेद पूर्वक सांगावे लागते. मी पुरुष असून देखील स्त्रियांच्या हितासाठी व त्यांच्या



Lecturer
Shivaji College, Hingoli
Dist. Hingoli (MS.)
266
Scanned with OKEN Scanner

ISSN-2277-8721
EIIRJ Electronic International Interdisciplinary Research Journal
Volume–XI, Special Issue– I Nov – Dec 2022
OPEN ACCESS Original Research Article

हक्कासाठी भांडलो. पण स्त्रियांनी का उत्सुकता दाखवली नाही हे समजत नाही. ह्या बिलाला पाठिंबा देण्याची गोष्ट तर बाजूलाच राहो, पण काही स्त्रियांनी माझ्याकडे येऊन ते बिल चांगले नाही असे मला सांगण्याचा प्रयत्न केला. मी दिल्लीत असताना तर काही प्रमुख स्त्रियांचे शिष्टमंडळात माझ्याकडे आले. त्यांना मी ते बिल वाचले का म्हणून विचारले तर त्यांनी ते वाचले नाही असे सांगितले. न वाचताच का विरोध करता असे विचारता ती म्हणाली, 'माझ्या नवऱ्याने मला सांगितले की तू या बिलाला विरोध कर नाहीतर मी दुसरी बायको करेन म्हणून सवत करण्यापेक्षा बिलालाच विरोध करणे मला भाग आहे."3 ते पुढे म्हणतात की, स्त्रियांची ही मानसिक दुर्बलता आहे. त्यांच्या ह्या दुर्बलतेमुळे घात झाला. त्यांच्या मते ह्याच स्त्रियांच्या पायात ताकद असती तर त्यांनी बिलाला विरोध केला नसता. अशा प्रकारची उदासीनता पाहून डॉ. आंबेडकरांना अतिशय दुःख झाले. संसदेच्या सभागृहात ही हेच चित्र त्यांच्या दृष्टीस पडले. डॉ. राजेंद्र प्रसाद यांच्यासारख्या धुरंधर व्यक्तीनेही 'मी जुन्या मताचा आहे.' असे सांगून विरोध दर्शविला. तसेच त्यांच्यासारखे अनेक दिग्गजही ठरले. ज्यांनी हिंदू कोड बिलाला जाहीर आणि प्रखर विरोध केला. याचे कारण भारतात असलेली, रुजलेली पुरुषप्रधान संस्कृती हे होय. अनेकांना तर संपत्तीत द्याव्या लागणाऱ्या हिश्याची कल्पना दू:सह्य झाली. त्यांनी बिल मोडीत काढण्यासाठी आटोकाट प्रयत्न केले. मागास विचार प्रवृत्तीमुळे, स्वार्थामुळे हा विरोध होत होता. त्यात वर्चस्ववादी भावनेमुळे स्त्रियांना सतत कमी लेखण्यात आले. त्याचा परिपाक असा झाला की ज्येष्ठ नेते मंडळीनेच ह्या बिलाला विरोध करण्यास सुरुवात केली. मागिल एका उदाहरणानुसार स्त्रियांना हे कोड बिल काय भानगड आहे हे समजण्या आधीच त्यांना धाक दाखवून त्याचे मत परिवर्तन बिल विरोधी करण्याच्या प्रयत्नात पुरुषांना यश आले. त्यांनी स्त्रियांना हे ही समजू दिले नव्हते की ह्या बिलामुळे आपल्याला मोठा फायदा होणार आहे. ही वस्तुस्थिती त्यांनी स्त्रियांना समजू दिली नव्हती. आणि त्यांचा विरोध स्वीकारला गेला. हे सर्व स्त्रियांच्या अज्ञानामुळे, अनास्थेमुळे घडले असे डॉ. बाबासाहेबांचे मत होते. पिढ्यानपिढ्या अत्याचार सहन करत आलेल्या स्त्रियांची विचार करण्याची क्षमता, त्यांच्यावर हुकुमशाही गाजविणारा पुरुषप्रधान समाज यामुळे तसेच आपल्या हक्का बद्दल जागरूक नसलेल्या स्त्रियां, आपला संसार आणि आपला पती एवढेच आपले विश्व समजून लाखो वर्षापासून जगत आलेल्या स्त्रिया यामुळे सनदशीर मार्गाने, लोकशाही पद्धतीने जे अधिकार स्त्रियांना प्रदान करण्यात येणार होते त्यापासून त्या पूर्णपणे अनभिज्ञ होत्या. दुसरे म्हणजे आपले वैवाहिक जीवन तर यामुळे संपणार नाही ना याची भीती त्यांच्या मनात पुरुषप्रधान व्यवस्थेने निर्माण केली होती. गुलामीत जगण्याची त्यांना आता सवय झाली होती. खरोखरच स्त्री सुद्धा स्वतंत्र राहू, बोलो, निर्णय घेऊ शकते यावर ना पुरुषाचा विश्वास होता ना स्वतः स्त्रियांचा विश्वास होता. यामुळेच महिलांच्या स्वातंत्र्याचा जाहीरनामा पुरुषप्रधान व्यवस्थेला तर मान्य नव्हताच पण ज्यांना त्याचा उपभोग घ्यावयाचा होता त्यांना समाजव्यवस्थेच्या भीतीने आणि स्वतःच्या अज्ञानामुळे नाकारावा लागला. या ठिकाणी मला एक गोष्ट सांगावीशी वाटते ती अशी की, स्त्रीवादी चळवळीच्या अग्रणी असलेल्या सिमोन दि बुवा हिने आपल्या 'दि सेकंड सेक्स' या ग्रंथात असे सांगितले आहे की, "स्त्री ही जन्मत नसते तर ती घडविली जाते."4 तिने व्यक्त केलेले हे मत या ठिकाणी तंतोतंत लागू झाले आहे. कारण जी स्त्री नैसर्ग अवस्थेत असताना पुरुषाच्या ताकदीने सर्वत्र वावरू शकते ती स्त्री अचानक अबला, निर्बुद्ध कशी असू शकेल? याचा गांभीर्याने

T.C. Lecturer Shivaji College, Hingoli Ta.& Dist.Hingoli (M.S.)



Scanned with OKEN Scanner

ISSN-2277- 8721

Electronic International Interdisciplinary Research Journal

EIIRJ

Nov – Dec 2022

Volume-XI, Special Issue- I

OPEN ACCESS

Original Research Article

SHIVAJI COLLEGE HINGOLI

विचार करावा लागतो. मध्ययुगीन आणि आधुनिक काळातील स्त्री ही घडविल्या गेल्यामुळे पुरुषांना पाहिजे अगदी तशी शोभेची वस्तू, बाहुली बनून राहिली आहे. निर्बुद्ध झाली आहे. तिला तिच्या हिताचे काय? व अहिताचे काय? हे समजायला ही वाव राहिला नाही. कारण ती तिच्या निसर्गावस्थेतील स्त्री नसून ती घडवलेली स्त्री आहे हे सिमॉन दि बुवांचे म्हणणे खरे ठरते.

**निष्कर्ष :**

१) हिंदू कोड बिलाच्या माध्यमातून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्त्रीला आत्मभान निर्माण करण्याचा प्रयत्न केला.

२) हिंदू कोड बिल यामुळे भारतीय समाजातील पुरुषप्रधानता किती खोलवर रुजली आहे हे समजले.

३) हिंदू कोड बिलाच्या निमित्ताने आजही स्त्रियांच्या मानसिकता त्या काळाच्या मानाने फारशी बदललेली दिसत नाही.

४) हिंदू कोड बिल म्हणजे स्त्रियांच्या हक्काचा जाहीरनामा होय.

**संदर्भ सूची :**

➢ द बाबासाहेब आंबेडकर आणि हिंदू कोड बिल, रत्नाकर गणवीर प्रकाशन नागपूर.

➢ तत्रैव.

➢ तत्रैव.

➢ दि सेकंड सेक्स, सिमॉन दि बुवा.

**Cite This Article:**

प्रा. डॉ. भुसारे सुनंदा रामचंद्र, (2022) हिंदू कोड बिल आणी भारतीय महिला, *Electronic International Interdisciplinary Research Journal, Volume No XI (Special Issue-I), 154-158.*

T. C

Assistant Professor
Shivaji College,Hingoli.
Tq.& Dist.Hingoli.(MS.)



Scanned with OKEN Scanner